## निशाणी ७१ वरील आदेश

(वंदना नाईक वि. परीक्षित कमलाकर )

**CNR.No.MHSI06-000096-2017**

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपीतर्फे दाखल करणेत आलेला असून त्यायोगे, त्यांचेविरुध्द करणेत आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द होणेकरीता विनंती करणेत आलेली आहे. आरोपीच्या मते, आरोपी हा मागील तारखांच्या वेळी सर्दी तापाने आजारी असलेमुळे न्यायालयात हजर राहू शकलेला नाही. सबब, आरोपीविरुध्द पुरावा बंदचा आदेश करणेत आलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जास फिर्यादीतर्फे निशाणी क्र. ७३ लगत म्हणणे दाखल करणेत आलेले असून आरोपीच्या अर्जातील कथनांचा स्पष्टपणे इन्कार केलेला आहे. फिर्यादीच्या मते, आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन दि.२०/११/२०१८ रोजी नोंदविणेत आलेले असून त्यानंतर पुरेसा कालावधी देवून देखील आरोपीने त्याचा पुरावा सादर न केलेमुळे पुरावा बंदचा आदेश पारीत झालेला आहे. आरोपी हा जाणीपूर्वक पुरावा देणेस टाळाटाळ करीत असलेमुळे सदरचा अर्ज नामंजूर होणे जरुरीचे आहे.

३. आरोपी व फिर्यादीतर्फे विधिज्ञ यांचे युक्तीवाद ऐकले.

४. प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख व रोजनामा पाहता निश्चितपणे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन दि. २६/११/२०१८ रोजी नोंदविणेत आलेले आहे हे स्पष्ट होते. तद्नंतर निशाणी क्र. ६१ वर दि. ०६/०२/२०२१ रोजी आदेश पारीत करुन माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीस पुरावा सादर करणेस परवानगी दिलेचे दिसून येत आहे. तद्नंतर कोविड-१९ रोगाचा प्रादुर्भाव टाळणेकरीता न्यायालयाचे निर्बधित केलेले कामकाज हे सप्टेंबर २०२१ मध्ये सुरु झालेनंतर आरोपीतर्फे दि. ०९/१०/२०२१ व दि. २३/१०/२०२१ रोजी निशाणी क्र. ६५ व ६८ लगत पुरावा सादर करणेस मुदत देणेबाबतचे अर्ज मंजूर करणेत आलेले

आहेत. तद्नंतर दि. १०/११/२०२१ रोजी निशाणी क्र. ६९ लगत आरोपीतर्फे देणेत आलेला मुदत अर्ज नामंजूर करुन पुरावा बंद केलेबाबतचा आदेश पारीत करणेत आलेला आहे. ही सर्व परिस्थिती विचारात घेता, आरोपीस पुरेशी संधी देवून देखील त्याने त्याचा पुरावा वेळेत सादर केलेला दिसून येत नाही. नैसर्गिक न्यायतत्वानुसार दोन्ही पक्षास पुरावा सादर करणेस पुरेशी संधी मिळणे आवश्यक आहे. हे तत्व विचारात घेता, आरोपीचा सदरचा अर्ज आरोपीने केलेल्या विलंबाची नुकसान भरपाई म्हणून फिर्यादीस द्रव्यदंड देणेचे अटीवर मंजूर झालेस फिर्यादी व आरोपी यांचे कोणाचेही नुकसान होणारे नाही. याउलट सदरचा अर्ज नामंजूर झालेस आरोपीस त्याचा बचाव न्यायालयासमोर सादर करता येणार नाही. सबब, न्यायाचे कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपीने फिर्यादीस रक्कम रुपये १,०००/– इतका द्रव्यदंड देणेचे अटीवर सदरचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. आरोपीने पुढील नेमले तारीखेस त्याचा पुरावा सादर करणेचा आहे.

३. आरोपीने पुढील नेमले तारीखेस त्याचा पुरावा सादर करणेस कसूर केलेस सदर आदेश रद्दबातल होणार आहे.

४. पुढील नेमली तारीख २४/०३/२०२२.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DURGA BHAGAWAN SUTAR
Date: 2022.03.10 15:11:13 +0530

( डी.बी.सुतार )

दिनांकः–०९/०३/२०२२. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.